जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 JUN 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये 'शिवराज' प्रथम

गडहिंग्लज : प्रतिनिधी

येथील शिवराज महाविद्यालयाने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत तसेच वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत निमशहरी गटात प्रथम क्रमांक पटकावला. शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील २९० महाविद्यालयांमध्ये सलग दोन पारितोषिके पटकावणारे हे एकमेव महाविद्यालय आहे.



कोल्हापूर : प्रा. विश्वजित कुराडे यांना वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे प्रशस्तीपत्र देताना प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. उपस्थित मान्यवर.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत सलग पाचव्यांदा आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत सलग दुसऱ्यांदा हे पारितोषिक पटकाविण्याचा मान महाविद्यालयाला मिळाला आहे. शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांना विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रशस्तीपत्र दिले. प्र.कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रा. विश्वजित कुराडे यांना वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

संस्था अध्यक्ष प्रा. किसन कुराडे यांच्या मार्गदर्शनाने ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर करिअरच्या संधी देण्यात महाविद्यालय अग्रेसर असल्याचे सचिव डॉ. अनिल कुराडे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील प्रवेशाची आजपासून दुसरी फेरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध शाखांमधील विविध ३७ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची दुसरी फेरी शनिवारपासून सुरू होणार आहे.

विद्यापीठ कॅम्पसमधील विविध विभागांत अडीच हजारांहून अधिक प्रवेश जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. त्याची गुणवत्ता यादी जाहीर होऊन ९ जूनपासून प्रवेश निश्चितीस सुरुवात झाली आहे. पहिल्या फेरीत सुमारे १३०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. त्यानंतर शनिवारपासून (दि. १४) दुसरी फेरी सुरू होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2025

पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ६ हजार ४४५ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ६ हजार ४४५ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बीए., बी.कॉम., बीएस्सी., बीसीए., बीबीए., बी.टेक., एमसीए., पीजी डिप्लोमा इन बायो-इन्फॉर्मेटिक्स आदी १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. भरारी पथकाकडून सातारा (०२) व कोल्हापूर (१०) असे मिळून १२ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2025
तरुण भारत

# 'पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ द्यावी'

**कोल्हापूर :** सध्या महाराष्ट्रात इयत्ता दहावी व बारावी नंतरच्या पदविका अभियांत्रिकी, पॅरामेडिकल, कृषी विषयक पदविका अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत अर्ज दाखल करण्याची अंतिम १६ जून आहे. परंतु कोल्हापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थ्यांचे जातीचे दाखले, नॉन क्रिमीलेअर दाखले, उत्पन्नाचे दाखले, ईडब्लूएस, एसइबीसी आदी आवश्यक दाखले मिळालेले नाहीत. सर्व्हर डाऊन किंवा अन्य कारणांमुळे दाखले मिळण्यास विलंब होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पदविका अभ्यासक्रम शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना १६ जून पर्यंत दाखले न मिळाल्यास प्रवेश घेता येणार नाही. म्हणून शासनाने केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेस किमान दहा दिवसाची मुदत वाढ द्यावी, अशी मागणी ओबीसी बहुजन आघाडीच्या वतीने उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत पाटील यांच्याकडे केली आहे. तर निवासी जिल्हाधिकारी संजय तेली यांना निवेदन देण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2025
पुढारी

# एम.फिल./प्री पीएच.डी. कोर्सवर्क अभ्यासक्रम परीक्षा प्रारंभ १ जुलैपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील एम.फिल./प्री पीएच.डी. कोर्स वर्क अभ्यासक्रमाच्या परीक्षा प्रारंभाची १ जुलै सुधारित तारीख जाहीर करण्यात आली आहे. विद्यापीठाने यापूर्वी परीक्षा प्रारंभ तारीख २३ जून जाहीर केली होती. परंतु याकालावधीत यूजीसी-नेट परीक्षा होणार आहे. त्यामुळे एम.फिल./प्री पीएच.डी. कोर्सवर्क अभ्यासक्रमाच्या परीक्षा प्रारंभ तारखेत बदल केल्याची माहिती सहायक कुलसचिव डॉ. के. ए. गुरव यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.